**अतितात्काळ/कालमर्यादा**

क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/२६/२०२३ मुंबई, दि.३० /०६/२०२३

संदर्भ:- या कार्यालयाचे आदेश क्र.पोमसं/३१/३९-१/ऑनलाईन-घबांअ-अर्ज/ २६/२०२३, दि.२६/०६/२०२३

विषय:- राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँक/ वित्तीय संस्थामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत.

******

**परिपत्रक**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भाधीन आदेशान्वये घरबांधणी अग्रिम मंजुरीचे आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत. घरबांधणी अग्रिम वाटप तसेच त्याची वसुलीबबात करावयाची कार्यवाही याअनुषंगाने **सोमवार, दि.०३/०७/२०२३ रोजी ठिक १२.३० वाजता विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन बैठक (VC) आयोजीत करण्यात आलेली आहे.**

सदर बैठकीस पोलीस आयुक्त कार्यालयातील **पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)**/ ( जर पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) नसतील तर अपर पोलीस आयुक्त(प्रशासन)) व पोलीस अधीक्षक कार्यालयातयातील **अपर पोलीस अधीक्षक** यांनी घरबांधणी अग्रिमाचे कामकाज हातळणाऱ्या संबंधीत अधिकारी/ लिपीक यांच्यासह खालील माहिती घेऊन हजर रहावे. **एकाच शहरातील इतर घटक कार्यालयातील अधिकारी यांनी शहरातील पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक येथे उपस्थित राहुन ऑनलाईन बैठकीस (VC) हजर रहावे**

| अ.क्र. | मुद्दा |
|---|---|
| १. | या कार्यालयाच्या संदर्भाधीन आदेशान्वये घटकनिहाय घरबांधणी अग्रिम वितरीत करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने दि.३०/०६/२०२३ पर्यंत सर्व घटक कार्यालयाने त्यांचे स्वतंत्र आदेश निर्गमीत करावेत. संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या खात्यावर सदरची रक्कम दि.३०/०६/२०२३ पर्यंत वितरीत करावी. तसेच त्याबाबतचा UTR नंबर घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअरमध्ये नमूद करावा. व सदर **ऑनलाईन** बैठकीच्या **(VC)** वेळी सदरची माहिती सोबत ठेवावी. |
| २ | काही पोलीस अधिकारी/ अंमलदार हे त्यांची नावे संदर्भाधीन आदेशामध्ये नमूद नसल्याने मा. पोलीस महासंचालक तसेच मंत्रालयात तक्रार करीत आहेत. सदर अधिकारी / अंमलदार यांचे घरबांधणी अग्रिमाचे अर्जाची **सॉफ्टवेअरमध्ये नोंद नसल्याने त्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले नाही**. तरी ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे **अर्ज दि.२६/०४/२०२३ पर्यंत घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअरमध्ये भरलेले आहेत.** परंतु त्यांची नावे संदर्भाधीन आदेशामध्ये समाविष्ठ नाहीत. याची **खात्रीकरुन त्यांचीच माहिती दि.२६/०६/२०२३ च्या परिपत्रकातील तक्त्यानुसार या कार्यालयाच्या desk३१.dgoffice@ mahapolice.gov.in या ईमेलवर पाठवावी, तसेच सदर माहिती ऑनलाईन बैठकीच्या (VC) वेळी सोबत ठेवावी.** |

३०/६/२३

( निसार तांबोली)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य. मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुबई
अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, म.राज्य, पुणे

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, अर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य. मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नवी मुंबई
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर/ नवी मुंबई/ नाशिक शहर/ ठाणे शहर/ पिंपरी चिंचवड/ नागपूर शहर/ अमरावती शहर/ पुणे शहर/ औरंगाबाद शहर/ मिरा-भाईदर-वसई-विरार
पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई
पोलीस आयुक्त, गुन्हे अन्वेषण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग,कल्याण/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण/ दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
पोलीस अधीक्षक, रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ सातारा/ कोल्हापूर/ सोलापूर ग्रा./ नाशिक ग्रा./ धुळे/ नंदूरबार/ जळगांव/ अहमदनगर/ बीड/ उस्मानाबाद/ सांगली/ लातूर/ परभणी/ हिंगोली/ नांदेड/ जालना/ पालघर/ वर्धा/ अकोला/ यवतमाळ/ भंडारा/ गोंदिया/ नागपूर ग्रा./ गडचिरोली/ वाशिम/ चंद्रपूर/ ठाणे ग्रा./ अमरावती ग्रा./बुलडाणा/ पुणे ग्रा./औरंगाबाद ग्रा.
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे/ नागपूर/औरंगाबाद
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर
समादेशक, राज्य राखीव पोलीस गट क्र.१/२/३/४/५/६/७/८/९/ १०/११/१२/१३/१४/१५/१६
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना/ अकोला/ बाभळगांव-लातूर/ तुरची सांगली/ नानवीज दौंड/ मरोळ-मुंबई/ नागपूर/ खंडाळा
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण, केंद्र, नागपूर/UCTC- मुंबई
समादेशक, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे/ नागपूर/
उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, अमरावती/ कोल्हापूर/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/नांदेड/ पुणे

प्रत माहिती व कार्यवाहीकरीता.

पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

यांनी सोमवार, दि.०३/०७/२०२३ रोजी ठिक १२.३० वाजता ऑनलाईन बैठक (VC) आयोजीत करण्यात आली असल्याने त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.